राज्यातील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अनुदानीत दराने तूरडाळ व चणाडाळ वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः अधापु-२०१९/प्र.क्र.५२/ना.पु.२२
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १ मार्च, २०१९

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने खरेदी केलेला तूर व चणा यांची भरडाई करुन प्राप्त होणारी तूरडाळ व चणाडाळ महाराष्ट्र राज्यातील लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थी यांना अनुदानीत दराने उपलब्ध करुन द्यावयाची आहे. त्या दृष्टीने राज्य शासनाने केलेल्या मागणीनुसार केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यास त्यांच्या दि. २१.२.२०१९ च्या पत्रान्वये तूर व चणा उपलब्ध करुन दिला आहे. सदर तूर व चण्याची नाफेडच्या विहित केलेल्या गोदामांमधून उचल करुन, त्याची भरडाई करुन, सदर तूरडाळ व चणाडाळ राज्य शासनाने विहित केलेल्या शासकीय गोदामांपर्यंत पोहोचविण्याकरिता NeML NCDEX Group Company यांच्यामार्फत मिलर्सना सदर काम देण्याकरिता ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. अशी ई-निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत यापूर्वीच दि. १२.९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये धोरण ठरविण्यात आले आहे. राज्यातील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना दोन्हीपैकी १ डाळ प्रतिमाह प्रतिशिधापत्रिका १ किलो वाटप करण्याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

१) नाफेडकडून तूर व चणा यांची उचल करणे, त्याची भरडाई करणे, भरडाईअंती प्राप्त झालेली तूरडाळ व चणाडाळ १ किलोच्या पाकीटामध्ये पाकीटबंद करुन राज्य शासनाने विहित केलेल्या गोदामांपर्यंत तसेच विहित केलेल्या परिमाणात सदर तूरडाळ व चणाडाळ पोहोचविण्याकरिता NeML NCDEX Group Company यांनी केलेल्या तुरीच्या निविदा प्रक्रियेअंती झोन-१ साठी (नागपूर व अमरावती विभाग) नागरमल, झोन-२ साठी (औरंगाबाद व नाशिक विभाग) माहेश्वरी व झोन-३ साठी (कोकण व पुणे विभाग) सोनू मोनू या मिलर्सची नियुक्ती करण्यात येत आहे.

NeML NCDEX Group Company यांनी केलेल्या चण्याच्या निविदा प्रक्रियेअंती झोन-१ साठी (नागपूर व अमरावती विभाग) व झोन-२ साठी (औरंगाबाद व नाशिक विभाग) सप्तश्रृंगी व झोन-३ साठी (कोकण व पुणे विभाग) यासाठी etc Agro या या मिलर्सची नियुक्ती करण्यात येत आहे.

२) लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना तूरडाळ प्रतिकिलो ₹ ५५/- व चणाडाळ ₹ ४५/- प्रतिकिलो या दराने प्रतिमाह प्रतिशिधापत्रिका १ किलो डाळ (दोन्हीपैकी एक डाळ १ किलो या कमाल मर्यादेत) याप्रमाणे वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर तूरडाळ व चणाडाळ यांची विक्री करण्याकरिता रास्तभाव दुकानदारांना ₹ १.५० प्रतिकिलो एवढे मार्जीन देण्यात येईल.

४. याकरिता होणारा खर्च या विभागाच्या स्वीय प्रपंजी लेख्यातून करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०११५३७५१७४०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Hemant Raghunath Wadikar

Digitally signed by Hemant Raghunath Wadikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supplies and Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9d625ae15602d3ab3345690ad8034be0a2c6937e181f74a8b36405029a161ebf, cn=Hemant Raghunath Wadikar
Date: 2019.03.01 15:41:31 +05'30'

(हेमंत वाडीकर)

कार्यासन अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. सर्व विधान परिषद सदस्य व विधानसभा सदस्य.
८. सर्व मंत्रालयीन विभाग

९. सर्व विभागीय आयुक्त
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
१२. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
१३. वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई
१४. सर्व उपायुक्त (पुरवठा)
१५. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
१६. सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
१७. सर्व अधिकारी (सचिव वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
१८. सर्व कार्यासने, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
१९. सर्व खाजगी सचिव, मा. मंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
२०. सर्व खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
२१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२२. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, ६वा मजला, विधानभवन, मुंबई
२३. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
२४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
२५. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-२, मुंबई
२६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, मुंबई
२७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
२८.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, नागरी पुरवठा, लेखा परिक्षा मंडळ द्वारा - वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
२९.वित्त विभाग, व्यय-४, मंत्रालय, मुंबई
३०.प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहायक
३१.सर्व उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
३२. NCDEX e Market Limited, १st Floor, Ackruti Corporate Park, LBS Road, Kanjur Marg (W), Mumbai.
३३. निवडनस्ती (कार्यासन नापु-२२).